# प्रेस नोट

मा. डॉ भूषण कुमार उपाध्याय, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र कारागृह विभागाने Video Conferencing च्या वापरामध्ये सन 2016 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे.



दि:14-15 डिसेंबर 2017 या कालावधीमध्ये सन्मा.सर्वोच्च न्यायालय सनियंत्रण करत असलेल्या "Use of Video Conferencing between Courts&Prisons" (For Judicial, Prisons, Prosecution and Police Officers) या विषयावर TOT (Training of Trainers) साठी प्रशिक्षण जयपूर ,राजस्थान येथे यशस्वीरीत्या पार पडले. सदर प्रशिक्षणासाठी राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दमण आणि दिव व दादरा नगर हवेली इत्यादी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे Judicial, Prison, Prosecution, Police विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पाच ते सहा राज्यांचे गट तयार करून सदर प्रशिक्षण संपूर्ण देशातील राज्यासाठी व केंद्रशासित प्रदेशांसाठी देशात विविध ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटन प्रसंगी सन्मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ई-कमिटी चे प्रतिनिधी व एन. आय.सी.चे प्रतिनिधी यांनी पुढील प्रमाणे माहिती जाहीर केली- **सन-2016 मध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंग च्या वापरामध्ये महाराष्ट्र राज्याने एकूण 7 हजार तास वेब बेस V.C.चा वापर करून 77624 कैदी व्हिडीओ कॉन्फान्सिंगद्वारे हजर करुन प्रथम क्रमांक मिळवला आहे तर राजस्थान या राज्याने एकूण 2 हजार तास वेब बेस V.C.चा वापर करून 20000 कैदी व्हिडीओ कॉन्फान्सिंगद्वारे हजर करुन दुसरा क्रमांक मिळवला आहे.**

उपस्थित सर्व राज्यांच्या प्रतिनिधींनी महाराष्ट राज्यातील कारागृह विभाग व मा. न्यायालये यांचे अभिनंदन केले. तसेच दोन दिवसांच्या प्रशिक्षण वेळी महाराष्ट्र कारागृह विभाग V.C.चा वापर अन्य चांगल्या उपक्रमांसाठी सुद्धा करत असलेबाबत अनेक मान्यवरांनी माहिती दिली. जसे कारागृहातील आजारी बंद्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील /रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी **टेलिमेडिसिन सुविधा**, मोफत कायदे विषयक सल्ला घेण्यासाठी **टेली-लिगल ऐड**, कारागृहात बंदीस्थ असणाऱ्या नातेवाईकांना भेटण्यासाठी **टेली-मुलाकात**, माहितीच्या अधिकारातील बंदयाच्या अपिलावरील सुनावणीसाठी मा. राज्य माहिती आयुक्त यांचे समोर V.C. द्वारे बंद्यांना हजर करणे, मा.मुख्यालयातून प्रादेशिक विभाग प्रमुख व कारागृह अधीक्षक यांचेशी बैठक घेणे, प्रादेशिक विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कारागृह अधीक्षक यांचे बैठका आयोजीत करणे, विविध समिती सदस्य महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठका आयोजीत करणे, कारागृह अधिकारी व कर्मचारी यांना V.C.द्वारे ऑनलाईन प्रशिक्षण देणे इत्यादी.

सन्मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ई-कमिटी चे प्रतिनिधी व एन.आय.सी.च्या प्रतिनिधी यांनी इतर राज्यांच्या प्रतिनिधींना महाराष्ट्र राज्याप्रमाणे V.C. चा वापर वाढवून न्यायप्रक्रिया /सूनावणीचा वेग जलद करावा असे आवाहन केले.

महाराष्ट्र राज्यातून सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित असणारे मा. श्री. व्ही. बी. काकटकर, जिल्हा न्यायाधीश, सांगली, मा. श्री. व्ही. एस. साठे, जिल्हा न्यायाधीश, गोंदिया, मा. श्री. जी. पी. देशमुख, जिल्हा न्यायाधीश, नाशिक यांनी महाराष्ट्रातील कारागृहातून मोठया प्रमाणावर बंदी V.C. द्वारे हजर करण्यात येतात आणि V.C. सुरू असताना आवाज व व्हिडीओचा दर्जा अतिशय उत्तम असतो असे अनुभव उपस्थितांना सांगितले.

**(राजेंद्र जोशी)**
पोलीस उपअधीक्षक
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह आणि सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-1 करिता